मुंबई विद्यापीठ

क्र. वि.क./ ३८६ /२००२

परिपत्रक :-

सर्व अधिष्ठाते / प्राचार्य, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकिय, खाजगी, वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व तत्सम महाविद्यालये तसेच, उपकुलसचिव आस्थापना विभाग, शिक्षक नियुक्ती विभाग, विद्यापीठ विभाग प्रमुख यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :-

कुलसचिवांकरिता.

दिनांक ६-८-२००२

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण १००२/[२२८/२००२] आस्था - १
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ९ एप्रिल, २००२.

अत्यंत महत्वाचे

प्रति,

सर्व विद्यापीठाचे कुलगुरू व कुलसचिव,
संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई - १.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १.
संचालक, कला शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई - १,
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - २३.
संचालक, उद्योगधंदे व संस्था समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई - १,
सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेली पदे भरण्याबाबत.

संदर्भ :- सचिव आदिवासी विकास विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. अजस २००१/प्र.क. ९०/का.९, दिनांक - २६ मार्च, २००२.

अनुसूचित जमाती कल्याण समितीसमोर काही विद्यापीठांच्या अलिकडेच साक्षी झाल्या. त्यामध्ये असे निदर्शनास आले की, अनुसूचित जमातीसाठी असलेली रिक्त पदे भरण्याबाबत सर्व स्तरांवर मोठ्या प्रमाणात उदासिनता दिसून आली आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीसाठी असलेलीराखीव कोट्यातील पदे रिक्त रहात आहेत. तसेच, ही पदे विहित पध्दतीने भरण्याबाबत आवश्यक तो प्रयत्न केला जात नाही ही अत्यंत गंभीर बाब असून त्यामुळे अनुसूचित जातीवर अन्याय झाल्याची भावना अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या सदस्यांनी व्यक्त केली. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

२. सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेश / परिपत्रकांनुसार अनुसूचित जमातीच्या पदांसाठी वेळोवेळी भरती करण्यात यावी, यासाठी पाठपुरावा करण्यात यावा. त्यानुसार संबंधित प्रत्येक प्रशासकिय विभागांनी त्यांच्या अधिनस्थाखालील कार्यालयानी ह्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घ्यावा. वर्ग - ३ व वर्ग - ४ मधील पदांवर सरळ सेवा भरतीने नेमणूका करताना मुलाखतीसाठी येणा-या आदिवासी उमेदवारांचे हित

कृ. मा. प.

राखण्याच्या दृष्टिने त्या - त्या जिल्हयातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आदिवासी विकास अधिका-यांना बोलविण्यांत यावे. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदावरील तसेच त्या पदावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या जाती विषयक प्रमाणपत्राची तपासणी करण्यात यावी. प्रत्येक कार्यालयाने अशी तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

३. अनुसूचित जमातीचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष मोहिमा ही पदे भरण्यांत येतील व अनुशेष राहणार नाही याची दक्षता अनुसूचित जाती/जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती इतर वर्ग व ... विशेष मागास वर्ग या राखीव जागांवर नियुक्त झा. होणा-या सर्व अधिकारी/कर्मचा-यांच्या जाती / जमाती विषयक प्र पत्रांची तपासणी संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घ्यावी.

४. आदिवासीकरिता राखीव असलेल्या जागांवर बिगर आदिवासींची नियुक्ती होऊन त्यामुळे ख-या आदिवासींवर अन्याय होत असल्याचे लक्षात घेऊन अलिकडेच आदिवासी विकास विभागाने अलिकडेच महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग [ जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ] अधिनियम,२००० [ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ ]पारीत केला आहे. त्यानुसार आदिवासी जमातीकरिता राखीव असलेल्या जागांवर ज्या - ज्या नियुक्त्या केल्या जातात त्या उमेदवारांच्या जात विषयक प्रमाणपत्रांची तपासणी संबंधित अनुसूचित जमाती पडताळणी समितीकडून करुन घेण्याबाब प्रत्येक विभागाने दक्ष रहाणे आवश्यक आहे.

५. तरी सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण आपल्या विभागात तसेच आपल्या प्रशासकिय अधिपत्याखाली असलेल्या कार्यालयांमधून अनुसूचित जमातीसाठी असलेली राखीव पदे लक्षात घेता त्या पदांवर वेळोवेळी नियुक्त्या केल्या जात आहेत किंवा नाही याकडे लक्ष द्यावे. वरीलप्रमाणे कार्यवाही अनुदानित संस्थांनाही लागू राहील. अनुसूचित जमातीचे हित लक्षात घेऊन ही कार्यवाही त्वरेने करून अहवाल सचिव, आदिवासी विकास विभाग यांचेकडे तसेच या विभागाकडे विनाविलंब सादर करावा.
हि विनंती.

सही/-
[ चंदा अय्यंगार ]
सचिव